# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,
# महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

**(महिला व बाल विकास विभाग)**

**कार्यालयाचे पत्ता:-** रायगड भवन, रिअर विंग, पहिला मजला, सी.बी.डी.बेलापूर – ४००६१४

**Email:** comicdsraigadbhavan@gmail.com व icdshnd2@gmail.com ☎ 022-27576388,322,323 Fax-022-27576324


क्र. एबाविसेयो/का-२/आवपो/२०२०-२१/आपु/ १९०५ नवी मुंबई दिनांक – २६ / ०६ / २०२०

प्रति,

१. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)
जिल्हा परिषद .......... (सर्व)

२. बाल विकास प्रकल्प अधिकारी
नागरी प्रकल्प .......... (सर्व)

विषय :- राज्यातील कोरोना विषाणूची साथ आटोक्यात आणण्यासाठी ग्रामीण/ नागरी व आदिवासी भागातील प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत

संदर्भ :- १.शासनाचे पत्र.क्र.एबावि-२०२०/प्र.क्र.६०/का-५, दि.२० मार्च, २०२०
२.या कार्यालयाचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/आवपो/१२७७/२०१९, दि.२० मार्च, २०२०
३.या कार्यालयाचे पत्र क्र. एबाविसेयो/का-२/आवपो/२०२०-२१/कोविड-१९,दि.२३.४.२०२०
४.शासनाचे पत्र.क्र.एबावि-२०२०/प्र.क्र.६०/का-५, दि.१४ मे, २०२०
५.या कार्यालयाचे क्र. एबाविसेयो/का-२/आवपो/२०२०-२१/आपु/ १५३७,दि.१४.५.२०२० चे पत्र
६.शासनाचे पत्र.क्र.एबावि-२०२०/प्र.क्र.६०/का-५, दि.४ जून, २०२०
७.या कार्यालयाचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/आवपो/२०२०-२१/कधाआपु/१७२५,दि.४.६.२०२०
८.शासनाचे पत्र क्र. एबावि-२०२०/प्र.क्र.६०/का-५, दि.२६ जून, २०२०

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, ३ ते ६ वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्यासाठी संदर्भिय पत्र क्र.५ नुसार १६ मे ते १५ जुलै २०२० या कालावधीसाठी मान्यता देण्यात आली होती. तसेच संदर्भिय पत्र क्र.७ अन्वये २० जिल्हयांमधील शिल्लक साठा १६ मे पासून पुढे ज्या तारखेपर्यंत वितरीत केला आहे, त्या तारखेपासून पुढील ५० दिवसांसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ, मुंबई यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली होती.

शासनाच्या संदर्भिय पत्र क्र.८ नुसार राज्यातील कोरोना विषाणूची साथ अद्याप आटोक्यात आलेली नसल्याने सद्यस्थितीत अंगणवाडया नियमितपणे सुरु करणे शक्य होणार नाही व त्यामुळे अंगणवाडीत येणाऱ्या ३ ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यासाठी खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

१. १६ जिल्हयातील ग्रामीण प्रकल्प व राज्यातील सर्व १०४ नागरी प्रकल्पात दि.१६ जुलै, २०२० ते १५ सप्टेंबर, २०२० या कालावधीत ५० दिवसांसाठी गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचेकडे दि.१६ जुलै, २०२० ते १५ सप्टेंबर, २०२० या कालावधीत ५० दिवसांसाठी मागणी नोंदवावी.

२. २० ग्रामीण जिल्हयात (ज्या ठिकाणी पर्यायी व्यवस्थेअंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येतो) यापूर्वीच्या आदेशान्वये (संदर्भिय पत्र क्र.७ नुसार) ज्या तारखेपर्यंत मागणी नोंदविली आहे, त्या तारखेपासून पुढील ५० दिवसांसाठी गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचेकडे त्यापुढील कालावधीसाठी ५० दिवसांसाठी मागणी नोंदवावी.

कोविड-१९ च्या कालावधीत आहार पुरवठयासंदर्भात वरीलप्रमाणे शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांना त्वरीत पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही करावी.

२६/६/२०२०

**(इंद्रा मालो भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना**
**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**

**प्रत :-** १.मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, माहितीस्तव सविनय सादर
२.जिल्हाधिकारी, सर्व
३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
४.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर्स फेडरेशन, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना
यांना कळविण्यात येते की, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि) व बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प यांचेकडून मागणी प्राप्त होताच पुरवठा सुरु करण्याची कार्यवाही करावी.